अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 24 सप्टेंबर 2026 | वर्ष 12 वे | अंक 07 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# नागपूर पदवीधर मतदारसंघात निवडणूकीची रणधुमाळी

## काँग्रेस-भाजपामध्ये चुरशीची लढत होणार!

ब्रम्हपुरी/का.प्र.

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक २३ ऑक्टोबरला होणार असल्याचे जाहीर झाले आहे. या निमित्याने मतदारसंघाच्या जवळपास पाच दशकांच्या राजकीय प्रवासाला पुन्हा उजाळा मिळाला आहे. नागपूर, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली या सहा जिल्ह्यांचा समावेश असलेल्या या मतदारसंघावर १९७८ पासून भाजपा आणि त्यापूर्वीच्या जनसंघाचे वर्चस्व राहिले. मात्र, २०२०च्या निवडणुकीत काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी भाजपचे संदिप जोशी यांचा पराभव करून हे समीकरण बदलले.

१९७८ मध्ये गंगाधरराव फडणवीस यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले. त्यानंतर नितीन गडकरी यांनी या मतदारसंघातून विधान परिषदेत प्रवेश केला. १९९०, १९९६ आणि २००२ मध्ये त्यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले. २००२ मध्ये गडकरी बिनविरोध निवडून आले होते. २००८ मध्येही त्यांनी निवडणूक जिंकली. ही निवडणूक विशेष ठरली होती. गडकरी यांच्या विरोधात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस समर्थित बबनराव तायवाडे यांनी आव्हान दिले होते. त्यावेळी मतदारसंघात सुमारे १.८ लाख

(उर्वरित पान क्र. ६ वर)

### २०२० मध्ये प्रथमच भाजपचा पराभव

२०२० ची निवडणूक मात्र या मतदारसंघाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरली. कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर झालेल्या या निवडणुकीत २ लाख ६ हजार ४५४ मतदार नोंदणीकृत होते. त्यापैकी १ लाख ३२ हजार ९२३ मतदारांनी मतदान केले. मतदानाची अंतिम टक्केवारी ६४.३८ इतकी होती. काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी भाजपचे संदीप जोशी यांचा पराभव केला. वंजारी यांना एकूण ६१,७०१ मते मिळाली, तर जोशी यांना ४२,७९१ मते मिळाली. वंजारी यांनी १८,९१० मतांच्या फरकाने विजय मिळवला. १९७८ नंतर प्रथमच या मतदार संघातून भाजप किंवा जनसंघाबाहेरील उमेदवार विजयी झाला.

### ब्रम्हपुरी शहरातील श्रींचे विसर्जन

नेवजाबाई भैया हितकारिणी गणेश मंडळ, ब्रम्हपुरी
**दि. २५ सप्टेंबर २०२६**

ब्रम्हपुरीचा महाराजा गणेश मंडळ, ब्रम्हपुरी
**दि. २६ सप्टेंबर २०२६**

सार्व. गणेश उत्सव मंडळ, ब्रम्हपुरी स्व. बाबा खानोरकर
**दि. २८ सप्टेंबर २०२६**

# नागभीड तालुक्यातील गुरुदेव भक्तांचा आंदोलनाचा इशारा

## अड्याळ टेकडी प्रकरण तापले, नागभीडच्या तहसिलदारांना निवेदन

नागभीड/ता.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील अड्याळ टेकडी येथील भक्त निवासाच्या बांधकामाला देण्यात आलेली मंजुरी, जमिनीच्या मालकी हक्काचा वाद आणि तहसीलदारांनी दिलेल्या अहवालावरून गुरुदेवभक्तांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या प्रकरणी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागभीड तालुक्यातील गुरुदेव मंडळाच्या प्रतिनिधींनी दिला आहे.

यासंदर्भात गुरुदेव मंडळाच्या वतीने सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी नागभीड येथील तहसीलदार महेश देशमुख यांना निवेदन देण्यात आले. अड्याळ टेकडीवरील जमिनीच्या मालकी हक्काचा वाद न्यायालयीन प्रक्रियेत असताना शासन निधीतून भक्त निवासाचे बांधकाम सुरू करण्यात आल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. तसेच २८ जुलै २०२६ रोजी तहसीलदारांनी दिलेला मालकी हक्कासंदर्भातील अहवाल वस्तुस्थितीविरोधी असल्याचा आरोप गुरुदेवभक्तांनी केला आहे.

अड्याळ टेकडीवरील मालकी हक्कासंदर्भात काही संस्थांनी न्यायालयात दावे दाखल केले होते. मात्र कनिष्ठ न्यायालय तसेच जिल्हा न्यायालयाने संबंधित दावे फेटाळल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. त्यानंतर उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेत भू-वैकुंठ समितीचा ताबा व वहिवाट मान्य करण्यात आल्याचा दावा गुरुदेव मंडळाच्या प्रतिनिधींनी केला आहे.

दरम्यान, २२ जुलै २०२६ रोजी तलाठी मंडळाने केलेल्या पंचनाम्यात ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्राचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यानंतर २८ जुलै रोजी तहसीलदारांनी अड्याळ टेकडीवरील काही गट क्रमांकांवर अखिल भारतीय गुरुदेव सेवामंडळ, मोझरी यांची मालकी असल्याचा अहवाल दिल्याचे निवेदनात नमूद आहे. याच अहवालाला गुरुदेवभक्तांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या पार्श्वभूमीवर भक्त निवासाच्या बांधकामाची मंजुरी रद्द करावी, तहसीलदारांचा अहवाल मागे घ्यावा तसेच या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

अड्याळ टेकडी प्रकरणावरून गुरुदेवभक्तांचा असंतोष वाढत असून, प्रशासनाने प्रश्नाची तातडीने दखल न घेतल्यास मोठ्या आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा इशारा देण्यात आला आहे. विविध जिल्ह्यांतील हजारो गुरुदेवभक्तांना या आंदोलनात सहभागी करून घेण्याची तयारी सुरू असल्याचेही प्रतिनिधींनी सांगितले. यावेळी उपस्थित सप्तखंजरीवादक सत्यपाल महाराज, डॉ.नवलाजी मुळे गुरूजी, गजानन चिंचोळकर, दिनकर सहारे, प्रबोधनकार मधुकर टिकले, नगरसेविका किरण पाथोडे, शामभाऊ पानसे, प्रेमदास श्रीरामे, नंदकिशोर ठवरे, रामकृष्ण निकुरे, लोकेश मुळे उपस्थित होते.




ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

## संपादकीय...

# मराठा आरक्षणाचा तिढा

मराठा आरक्षणाबाबत आंदोलन करणारे मनोज जरीगे- पाटील ऐन गणेशोत्सवात मुंबईत येणार म्हणून धास्तावलेल्या राज्य सरकारचा जीव त्यांनी उपोषण मागे घेतल्याने भांड्यात पडला असावा. जरांगे यांनी उपोषण मागे घेतले असले तरी मराठा समाजाच्या अपेक्षा संपलेल्या नाहीत. सरकारसमोर आता केवळ आंदोलन शांत करण्याचे आव्हान नाही तर घटनात्मक चौकटीत, कायदेशीर कसोट्यांवर टिकणारा आणि समाजाच्या मागण्यांना न्याय देणारा मार्ग शोधण्याची जबाबदारी आहे. हजारो आंदोलकांचा आक्रोश, सरकारच्या शिष्टमंडळाची प्रदीर्घ चर्चा आणि उपोषण मागे घेण्याचा मनोज जरोगे - पाटील यांचा निर्णय या सर्व घटनांमुळे आता एकच प्रश्न महाराष्ट्राच्या मनात घोंघावत आहे की, ९० दिवसांच्या मुदतीत सरकार आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा काढणार की पुन्हा एकदा आश्वासनांच्या भोवऱ्यात अडकणार?

महाराष्ट्रातील मराठा समाजाचा आरक्षणाचा प्रश्न गेल्या दशकभरापासून राज्याच्या सामाजिक आणि राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. शिक्षणातील वाढता खर्च, सरकारी नोकऱ्यांमधील मर्यादित संधी, शेतीसमोरील संकट, बेरोजगारी आणि आर्थिक अडचणी या प्रश्नांमुळे समाजातील अनेक घटकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. या अस्वस्थतेला संघटित स्वरूप देत मराठा क्रांती मोर्चांनी मोठ्या प्रमाणावर आदोलने केली. २०१६ पासून सुरु झालेल्या या आंदोलनाच्या पुढील टप्प्यात मनोज जरांगे-पाटील हे प्रमुख आंदोलनकर्ते म्हणून पुढे आले. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन इतर मागासवर्गीय अर्थात ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळावा, ही त्यांच्या आंदोलनातील प्रमुख मागणी राहिली आहे. पात्र मराठा व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र मिळण्याच्या प्रक्रियेत काही प्रमाणात प्रगती झाली असली तरी संपूर्ण समाजाला आरक्षणाचा लाभ मिळण्याचा प्रश्न अद्याप गुंतागुंतीचा आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न सामाजिक न्याय, समान संधी, घटनात्मक तरतुदी आणि विविध मागासवर्गीय समाजांच्या हक्कांशी जोडलेला असल्याने या प्रश्नावर निर्णय घेताना सरकारला अनेक बाजूंचा विचार करावा लागतो. जरांगे यांची भूमिका स्पष्ट दिसते. आंदोलनाचा दबाव कायम ठेवत सरकारला मागण्यांवर कृती करण्यासाठी वेळ द्यायचा; मात्र हा वेळ अनिश्चित काळासाठी वाढू द्यायचा नाही.

मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवताना सर्वात मोठा अडथळा म्हणजे घटनात्मक आणि न्यायालयीन चौकट. आरक्षण देण्याचा निर्णय घेताना सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचे निकष, उपलब्ध आकडेवारी, विद्यमान आरक्षणाची मर्यादा आणि न्यायालयीन निर्णय यांचा विचार करावा लागतो. मराठा आरक्षणाकरिता सरकारने बहुआयामी भूमिका घेणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, पात्र मराठा व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली पाहिजे. सरकारने मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शिक्षण, कौशल्यविकास, रोजगार आणि उद्योगाच्या संधी वाढवण्यावर भर दिला पाहिजे. आरक्षण हा महत्त्वाचा विषय असला, तरी रोजगारनिर्मिती आणि आर्थिक सक्षमीकरणाशिवाय समाजातील अस्वस्थता पूर्णपणे कमी होणार नाही. एका समाजाला न्याय देताना दुसऱ्या समाजाच्या हक्कांवर अन्याय होणार नाही, याची खबरदारी घेणे ही सरकारची घटनात्मक जबाबदारी आहे. त्याचवेळी आंदोलनकर्त्यांनीही शांततामय आणि घटनात्मक मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या सामाजिक मनोवस्थेशी जोडलेला आहे. या प्रश्नाकडे केवळ आंदोलन म्हणून पाहणे चुकीचे आहे, तितकेच तो केवळ राजकीय आश्वासनांनी सोडवता येईल असे मानणेही चुकीचे ठरेल. आरक्षणाचा निर्णय हा कोणत्याही समाजाविरोधात नसून सामाजिक न्यायाच्या चौकटीत असला पाहिजे. मराठा समाजाच्या अपेक्षा, ओबीसी समाजाचे हक्क आणि संविधानाची मर्यादा यांचा समतोल साधणारा मार्ग शोधणे हीच खरी कसोटी आहे. आता महाराष्ट्राला आश्वासनांची नव्हे तर कृतीची प्रतीक्षा आहे. मुदत संपल्यानंतर पुन्हा आंदोलनाची वेळ येऊ नये यासाठी सरकारने आजपासूनच ठोस पावले उचलली पाहिजेत. कारण आरक्षणाचा हा प्रश्न केवळ एका समाजाचा नाही; तो महाराष्ट्राच्या सामाजिक विश्वासाचा प्रश्न आहे.

# ने.हि. विद्यालयाच्या हॉकी संघाची विजयी भरारी

## १४ व १७ वर्षाखालील संघांचा विभागीय स्पर्धेत दिमाखात प्रवेश



ब्रम्हपुरी/का.प्र.

ने. हि. उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरी आणि हॉकी यांचे अतूट नाते असून, शालेय हॉकी स्पर्धांमध्ये तालुका स्तरापासून जिल्हा व विभागीय स्तरापर्यंत उत्कृष्ट कामगिरी करण्याची विद्यालयाला उज्ज्वल परंपरा आहे. याच परंपरेला पुढे नेत 'क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा जिल्हा क्रीडा परिषद चंद्रपूर' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत विद्यालयाच्या १४ व १७ वर्षांखालील हॉकी संघांनी दमदार कामगिरी करत विभागीय स्पर्धेत दिमाखात प्रवेश केला.

चंद्रपूर येथे आयोजित जिल्हास्तरीय हॉकी क्रीडा स्पर्धेत १४ वर्षांखालील संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करतांना उपांत्य फेरीच्या सामन्यात नारायणी पब्लिक स्कूल, चंद्रपूरचा ३-० गोलफरकाने पराभव केला, तर अंतिम सामन्यात सेंट मेरी स्कूल, चंद्रपूरचा १-० गोलफरकाने पराभव करित विभागीय स्पर्धेसाठी आपले स्थान पक्के केले

तसेच १७ वर्षांखालील संघानेही आपल्या उत्कृष्ट खेळाची छाप पाडत उपांत्य फेरीच्या सामन्यात नारायणी पब्लिक स्कूल, चंद्रपूरचा ५-० गोलफरकाने दणदणीत पराभव केला आणि अंतिम सामन्यात आदित्य बिर्ला पब्लिक स्कूल, चंद्रपूर विरुद्धच्या चुरशीच्या सामन्यात संयम व सांघिक खेळाच्या जोरावर १-० गोलफरकाने विजय प्राप्त केला.या शानदार कामगिरीच्या जोरावर संघाने विभागीय स्पर्धेत प्रवेश निश्चित केला.

दोन्ही संघातील खेळाडूंनी संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट सांघिक खेळ, शिस्त, समन्वय आणि जिद्दीचे दर्शन घडवित विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात आणखी भर घातली. संघांना क्रीडा प्रशिक्षक निनाद गडे तसेच क्रीडा मार्गदर्शक गिरीधर सिंदीमेश्राम यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षणसंस्थेचे सचिव अशोक भैया व सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक के. एम. नाईक, उपमुख्याध्यापक ए. डब्ल्यू. नाकाडे, पर्यवेक्षक प्रा. पी.आर. जिभकाटे तसेच सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांनी दोन्ही विजेत्या संघांचे अभिनंदन केले. तसेच विभागीय स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

# विहार मेश्रामच्या भावाने मिळविला देशात अव्वल क्रमांक

## वैभव मेश्रामची बीआरओमध्ये उल्लेखनिय कामगिरी

ब्रह्मपुरी/का.प्र.



ब्रह्मपुरी तालुक्यातील चकबोथली येथील विहार मेश्राम यांचे भाऊ वैभव ओमराज मेश्राम (वय २६) यांनी Border Roads Organisation (BRO), Ministry of Defence अंतर्गत झालेल्या निवड प्रक्रियेत देशपातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. DES (MSW) पदासाठी त्यांनी ऑल इंडिया रँक-१ (AIR-1) मिळविला असून, Vehicle Mechanic पदासाठी AIR-37 क्रमांक प्राप्त केला आहे. दोन्ही पदांसाठी निवड झाल्याने वैभव यांच्या या कामगिरीची विशेष नोंद झाली आहे.

वैभव मेश्राम यांनी पॉलिटेक्निकचे शिक्षण घेतले असून तांत्रिक क्षेत्रात कौशल्य संपादन केले आहे. ग्रामीण भागातील कष्टकरी कुटुंबातून आलेल्या वैभव यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल आहे. त्यांचे आई बेबीनंदा मेश्राम व वडील ओमराज मेश्राम हे मजुरीचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. आर्थिक अडचणी असतानाही वैभव यांनी शिक्षण आणि तांत्रिक कौशल्याच्या जोरावर आपली वाटचाल सुरू ठेवली.

BRO अंतर्गत DES (MSW) पदासाठी AIR-1 मिळविण्यासोबतच Vehicle Mechanic पदासाठी AIR-37 क्रमांक प्राप्त करून त्यांनी दोन वेगवेगळ्या पदांसाठी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यशाचे श्रेय आई-वडील आणि मोठ्या भावाला दिले आहे. वैभवच्या या यशाबद्दल त्याचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## विनोदिनी

बंड्याच्या सर्व मित्रांची लग्ने झाली... केवळ बंड्याच लग्नाविना उरला होता... एके दिवशी तो आईला बोलला...
बंड्या : आई माझ्या सगळ्या मित्रांचे एकदर लग्न झाले आहेत किंवा ठरले आहेत.
आई : बर मग...?
बंड्या : माझं पण लग्न करून दे की आता.. माझंही लग्नाचं वय झालंय....
आई : बिलकुल नाही....
बंड्या : पण असं का...?
आई : तुझं जरी लग्नाचं वय झालं असले व तू लग्नाला तयार असलास तरी माझे सासू व्हायचे वय अजून झालेले नाही....!!!!

# ट्रॅव्हल्स चालकाला बेदम मारहाण प्रकरणी से.नि. ठाणेदारावर कोर्टाच्या आदेशाने गुन्हा दाखल

ब्रम्हपुरी/का.प्र.

'इथं आमचं राज चालणार!' असा आव आणत खाजगी कपड्यात येऊन एका ट्रॅव्हल्स चालकाला बेदम मारहाण करणे ब्रम्हपुरीचे तत्कालीन पोलीस निरीक्षक सुधाकर अंभोरे यांच्या चांगलेच अंगाशी आले आहे. पदाचा गैरवापर करत तक्रारही न नोंदवणाऱ्या या माजी ठाणेदाराविरुद्ध गुन्हा दाखल करून योग्य ती कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश ब्रम्हपुरीच्या प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दिले आहेत. या निर्णयामुळे पोलीस वर्तुळात एकच खळबळ उडाली असून पीडित चालकाला अखेर न्यायाची आशा दिसू लागली आहे.

घटना २६ नोव्हेंबर २०२३ ची आहे. नागपूरचे ट्रॅव्हल्स चालक मोहन अडिवकर हे प्रवाशांना घेऊन गडचिरोलीहून नागपूरकडे निघाले होते. दुपारी ब्रम्हपुरी रेल्वे फाटकाजवळ गर्दी असताना, एका आकाशी रंगाच्या इनोव्हा कारमधून (MH-29-AR-8855) साध्या कपड्यात उतरलेल्या इसमाने मोहन यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. पुढे ख्रिस्तानंद रुग्णालय चौकात या इसमाने मोहन यांना गाठले आणि वाहतूक पोलिसाची काठी हिसकावून त्यांच्या डोक्यावर व पायावर सपासप वार केले. मारहाणीत मोहन यांच्या डोक्यातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. नंतर कळाले की मारहाण करणारा तो इसम दुसरा कोणी नसून ब्रम्हपुरीचे ठाणेदार सुधाकर अंभोरे होते. अंभोरे यांनी रक्ताळलेल्या अवस्थेतच मोहन यांना बस चालवत पोलीस ठाण्यात आणायला भाग पाडले. ठाण्यात आणल्यावर चालकाची 'ब्रेथ टेस्ट' निगेटिव्ह आली. तरीही एका वाहतूक पोलिसाने मोबाईलमधील घटनेचे रेकॉर्डिंग बळजबरीने डिलीट केले.

रात्री घडलेल्या या प्रकारानंतर घाबरलेले मोहन अडिवकर तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात गेले. पण तिथल्या अंमलदारांनी स्वत:च्याच वरिष्ठाची पाठराखण करत तक्रार घेण्यास साफ नकार दिला. विशेष म्हणजे, घटनेच्या दिवशी ठाणेदार अंभोरे ज्या इनोव्हा कारने आले होते, ती कार वणी येथील एका मटका किंगची असल्याची चर्चा परिसरात पसरल्याने या साटेलोट्यावरही प्रश्न उपस्थित झाले.

पोलीस प्रशासनाने आपल्याच अधिकाऱ्याला वाचवण्याचा प्रयत्न केल्यानंतर, पीडित चालकाने वकिलांमार्फत न्यायालयात धाव घेतली. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालयाने या अर्जाची (फौ.कि. अर्ज क्र. २८/२०२४) गंभीर दखल घेतली. न्यायालयाने CrPC १५६(३) अन्वये तत्कालीन ठाणेदार सुधाकर अंभोरे यांच्यावर IPC २९४, ३२४, ३४१, ५०४ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा १४५(२) अंतर्गत गुन्हा दाखल करून सखोल तपास करण्याचे निर्देश दिले आहेत.

# शिवाजी विद्यालयाच्या खो-खो संघांची भरघोस कामगिरी

## १७ वर्षाखालील मुलांचा संघ तालुकास्तरावर अव्वल तर मुलींचा संघ उपविजेता

देसाईगंज/ता.प्रतिनिधी

देसाईगंज येथे नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत तुळशी येथील शिवाजी विद्यालयाच्या १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या खो-खो संघाने उत्कृष्ट कामगिरी करत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला. या विजयासह संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रवेश निश्चित केला आहे. तर याच वयोगटातील मुलींच्या संघाने उपविजेतेपद मिळविले.

शालेय सत्र २०२६-२७ अंतर्गत आयोजित या स्पर्धा देसाईगंज येथील क्रीडा संकुलात पार पडल्या. संघ प्रशिक्षक शिक्षक एन. जी. शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन केले. विजयी मुलांच्या संघात ओम बगमारे, सुहास गणविर, कृष्णा भूते, चैतन्य राऊत, लकी वझाडे, ईशांत राऊत, शिल्पकार रामटेके, सुजल नेवारे, दिशांत नागरे, नवनाथ ठेंगरी, यश शेंडे, निशांत ठेंगरी, चैतन्य पारधी, ओम बरडे व अंकुश रज्जाक यांचा समावेश आहे.



मुलींच्या उपविजेत्या संघात कुंकुम हुमणे, सृष्टी मारबते, संस्कृती मारबते, सृष्टी पत्रे, शीतल पिलारे, नव्या मिरगे, नव्या बुल्ले, रोहिणी कुत्तरमारे, वैष्णवी मैंद, दिव्या सोनवाने, धनश्री धोटे, स्नेहा दुणेदार, पूनम वझाडे, अश्विनी सुकारे व निलाक्षी रामटेके यांनी सहभाग घेतला.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. विजय कावळे, मुख्याध्यापक विष्णू दुनेदार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रशिक्षक एन. जी. शेंडे आणि सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र इंस्टिट्युट ऑफ फार्मसीत श्री गणेशाचे जल्लोषात विसर्जन



ब्रम्हपुरी/का.प्र.

बेटाला येथील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी तसेच महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक आणि राष्ट्रीय सेवा योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ लोणेरे यांच्या संयुक्त विद्यमाने १८ सप्टेंबरला श्रींचे डी.जे.च्या तालावर विसर्जन करण्यात आले. या वेळेस तीनही महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन दुधे, सुयोग बाळबुधे व डॉ.व्यंकटेश क्यावर्स, विभाग प्रमुख विशाल लोखंडे तसेच सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक गण व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

हा गणपती उत्सव पाच दिवस निरंतर अती उत्साहात साजरा केला गेला असून यामध्ये वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रमांचे तसेच विविध क्रीडा प्रकारांचा समावेश होता. रस्सी खेच, हंडी फोड, वॉली बॉल, बुध्दीबळ, कॅरम, एकल डान्स व समूह डान्स तसेच एकल गीत, समूह गीत, थ्रो बॉल, फ्लॅश मॉब नृत्य गायन, पेपर डान्स आणि अंताक्षरी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. दि.१७ सप्टेंबरला भजन तथा गोपाल काला दही हंडी व महाप्रसादाचे आयोजन सर्व विद्यार्थी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच निमंत्रित पाहुण्यांकरिता करण्यात आले होते.

विजेत्या व उपविजेत्या चमुंना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करून गौरविण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र पिसे यांची वेळोवेळी प्राप्त झालेली मदत व मार्गदर्शन तसेच सर्व प्राचार्य, प्राध्यापक गण आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचा सहभाग होता.

# तात्काळ पंचनामे करून कोरडा दुष्काळ घोषित करा

**- प्रा. प्रकाश बगमारे**

ब्रह्मपुरी/का.प्र.

यंदाच्या हंगामाच्या सुरुवातीला कोरड्या दुष्काळाची व्यक्त केलेली भीती अखेर खरी ठरत असल्याचे एकूण परिस्थिती वरून दिसून येत आहे. यावेळी पावसात मोठा खंड पडला आणि आता परतीच्या पावसा कडूनही फारशी अपेक्षा राहिलेली नाही. यामुळे संपूर्ण महाराष्ट्रभर दुष्काळाचे सावट पसरले आहे.

पावसाचे गणित बिघडले की त्याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसतो. आज शेतकऱ्यासमोर सर्वात मोठा प्रश्न उभा आहे तो उभ्या पिकांचा सोयाबीन, कापूस, धान, बाजरी, मका, तूर, मूग यासारख्या पिकावर पावसाच्या लहरीपणाचा परिणाम होत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. गावातील प्रत्येक शेतकऱ्याच्या पेरणीची वेळ, पावसाचा खंड, जमिनीचा प्रकार, पिकाची अवस्था आणि उपलब्ध पाणीसाठा वेगळे चित्र सांगू शकते. म्हणून दुष्काळाचे मूल्यमापन केवळ जिल्हास्तरीय सरासरीवर न करता गाव व तालुका निहाय वास्तवावर झाले पाहिजे. याबरोबरच पशुधनाचा प्रश्नही दुर्लक्षित करता येणार नाही.

जलसंधारण ,पाण्याची विकेंद्रीकरण, पिकांच्या पद्धतीत बदल, सूक्ष्म सिंचन, भूजल पुरणभरण, पाणी साठ्याचे शास्त्रीय व्यवस्थापन आणि स्थानिक पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीक नियोजन या गंभीर बाबीकडे गंभीर्याने पाहणे गरजेचे आहे. निसर्गावर सरकारचे नियंत्रण नाही पाऊस कधी पडेल, किती पडेल, कुठे पडेल हे सरकार ठरवू शकत नसले तरी पाऊस कमी पडल्यास शेतकऱ्यापर्यंत मदत किती वेगाने पोहोचेल, पाण्याचे नियोजन कसे केले जाईल, जनावरांचा चारा कुठून मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार कसा दिला जाईल हे सरकार नक्कीच ठरवू शकते. त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी चार ऑक्टोबर पासून पंचनामे सुरू करून योग्य तो मोबदला शेतकऱ्यांना मिळावा यासाठी सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार तात्काळ वस्तुनिष्ठ पंचनामे करून कोरडा दुष्काळ जाहीर करावा व प्रभावी उपाय योजना करावी अशी मागणी प्रा. प्रकाश बगमारे यांनी केली आहे.

# महावितरणतर्फे अभियंता दिनी ने.हि. विद्यालयात मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

## विजेची बचत काळाची गरज: विद्यार्थ्यांमध्ये विद्युत सुरक्षेबाबत जनजागृती

ब्रह्मपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारिणी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे महावितरण कार्यालयाच्या शहर विभागातर्फे अभियंता दिनाचे औचित्य साधून विद्युत सुरक्षा व वीज बचत या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये विद्युत सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, विजेचा सुरक्षित वापर करण्याच्या सवयी रुजविणे तसेच वीज बचतीचे महत्त्व पटवून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक के. एम. नाईक सर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महावितरणचे सहाय्यक अभियंता डिकेश्वर राऊत सर व शंकरपुरकर सर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रधान तंत्रज्ञ शिरीष राऊत, वरिष्ठ तंत्रज्ञ विजय दिवटे तसेच वरिष्ठ यंत्रचालक छत्रपती हुलके



तसेच शाळेचे उपमुख्याध्यापक नाकाडे सर ,पर्यवेक्षक जिभकाटे सर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विजय दिवटे यांनी विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. तुटलेल्या किंवा जमिनीवर पडलेल्या विद्युत तारांना हात लावू नये, विद्युत खांबांवर चढू नये तसेच खांबांच्या जवळ खेळू नये, अशा सुरक्षिततेच्या सूचना त्यांनी विद्यार्थ्यांना दिल्या. विजेच्या उपकरणांचा वापर करताना निष्काळजीपणा टाळावा आणि विद्युत धोक्याची परिस्थिती दिसल्यास मोठ्यांना किंवा संबंधित यंत्रणेला त्वरित कळवावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. यानंतर सहाय्यक अभियंता डिकेश्वर राऊत यांनी वीज वापरताना घ्यावयाची काळजी आणि विजेची बचत करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. दैनंदिन जीवनात वीज अत्यंत आवश्यक असली, तरी तिचा वापर जबाबदारीने करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले. वीज ही मौल्यवान ऊर्जा असून तिचा अपव्यय टाळणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचा संदेश त्यांनी दिला. सहाय्यक अभियंता शंकरपुरकर सर यांनी वीज बचतीसाठी करता येणाऱ्या सोप्या उपायांवर सखोल मार्गदर्शन केले. अनावश्यक दिवे व विद्युत उपकरणे बंद ठेवणे, गरजेनुसारच वीज वापरणे आणि ऊर्जाबचतीच्या सवयी दैनंदिन जीवनात अंगीकारणे, अशा उपायांद्वारे वीज बचत शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख अतिथी छत्रपती हुलके यांनी सौरऊर्जा आणि सोलर योजनेविषयी माहिती दिली. पर्यायी ऊर्जास्त्रोतांचा वापर वाढविणे आणि सौरऊर्जेच्या माध्यमातून ऊर्जा बचतीला चालना देणे याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक के. एम. नाईक यांनी आधुनिक जीवनात विजेचे अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट केले. शिक्षण, उद्योग, दळणवळण आणि दैनंदिन जीवनातील अनेक कामे विजेवर अवलंबून आहेत. त्यामुळे विजेचा काटकसरीने व सुरक्षितपणे वापर करणे ही काळाची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी स्वतः विद्युत सुरक्षेचे नियम पाळावेत आणि आपल्या कुटुंबात तसेच समाजातही वीज बचतीचा संदेश पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षेबाबत शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किसान सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सातपुते मॅडम यांनी केले. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षेचे नियम, वीज बचतीचे महत्त्व आणि सौरऊर्जेच्या वापराबाबत उपयुक्त माहिती मिळाली. 'विजेची बचत करा, सुरक्षित राहा आणि इतरांनाही सुरक्षिततेचा संदेश द्या,' हा संदेश या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

# कार्यकत्याने कॅन्व्हॉसवर साकारले प्रा. देशकरांचे पेंटिंग

ब्रह्मपुरी/का.प्र.

भाजपाचे नेते तथा ब्रह्मपुरी विधानसभेचे माजी आमदार प्रा. अतुलभाऊ देशकर यांच्यावरील कार्यकर्त्यांचे प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा पुन्हा एकदा अनोख्या पद्धतीने व्यक्त झाला.



मुई येथील कैलास घुले यांनी आपल्या कलेतून प्रा. अतुल देशकर यांचे सुंदर कॅन्व्हास ऑईल पेंटिंग साकारले. आपल्या बहुमूल्य वेळ, मेहनत आणि कलासाहित्याचा उपयोग करून तयार केलेली ही कलाकृती त्यांनी प्रा. देशकर यांना प्रेमपूर्वक भेट दिली.

कार्यकर्त्यांच्या मनात असलेले प्रेम आणि जिव्हाळा हीच अतुलभाऊंच्या प्रदीर्घ सामाजिक व राजकारणातील कमाई असल्याची भावना यावेळी व्यक्त झाली. याप्रसंगी तळोधीचे सरपंच अनिल तिजारे, मुईचे सरपंच व कैलास घुले यांचे भाऊ उमेश घुले व रुईचे माजी सरपंच सुजित बालपांडे उपस्थित होते.

**जल है तो कल है...**

# नागभीड-ब्रम्हपुरी मार्गावर भीषण अपघात

## दोघांचा दुर्दैवी मृत्यू तर ६ जखमी

ब्रह्मपुरी/का.प्र.

नागभीड ते ब्रह्मपुरी रस्त्यावरील कोर्धा गावाजवळ १९ सप्टेंबरच्या रात्री एक अत्यंत दुर्दैवी आणि भीषण अपघात घडला. एका चारचाकी गाडीला (MH 31 CD 9189) अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून ६ जण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, १९ सप्टेंबरच्या रात्री चारचाकी वाहन नागभीडकडून ब्रह्मपुरीच्या दिशेने जात होते. कोर्धा गावाजवळ आल्यावर एका अज्ञात वाहनाने या गाडीला जोरदार धडक दिली आणि वाहनचालक तेथून पसार झाला. धडक इतकी भीषण होती की, चारचाकी गाडीचा मोठा चक्काचूर झाला. या अपघातात नितीन उर्फ मिथुन विनायक भर्रे (वय ३७, रा. बोंडेगाव वार्ड, ब्रह्मपुरी) आणि श्रावणी हिमेश बेदरे (वय १२, रा. विरली, जि. भंडारा) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. एकाच वेळी दोन वेगवेगळ्या कुटुंबातील सदस्यांचा असा अचानक मृत्यू झाल्याने बोंडेगाव आणि विरली परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातातील जखमींमध्ये बोंडेगाव (ब्रह्मपुरी) येथील वैष्णवी नितीन भर्रे (वय ३२ वर्ष), आरूहू नितीन भर्रे (वय ४ वर्ष), निव्या नितीन भर्रे (वय १.५ वर्ष) तसेच विरली (लाखांदूर, जि. भंडारा) येथील मैथूला हिमेश बेदरे (वय ३५ वर्ष), हिमेश बंडू बेदरे (वय ४० वर्ष), शौर्य हिमेश बेदरे (वय १० वर्ष) यांच्या समावेश आहे. अपघातास कारणीभूत ठरलेल्या अज्ञात वाहनाचा आणि चालकाचा शोध पोलीस सध्या घेत आहेत.

# 'आकाशची आकाशवाणी' कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद

ब्रह्मपुरी/का.प्र.

'शहरी आणि ग्रामीण भागातील कुटुंबांमध्ये आज संवादाचा अभाव दिवसेंदिवस वाढत चालला आहे. आपण तंत्रज्ञानाशी गट्टी जमवली असली, तरी त्याच्या अतिवापरामुळे कुटुंबातील आपुलकीचा संवाद गमावून बसलो आहोत. बाप-लेक, माय-लेकी आणि आजी-आजोबा व नातवंडे यांच्यातील संवाद कमी झाल्याने अनेक कौटुंबिक समस्या निर्माण होऊन त्याचे रूपांतर वादात होत आहे. नवीन पिढीने तंत्रज्ञानाच्या आहारी न जाता कुटुंबातील सदस्यांशी जास्तीत जास्त संवाद साधून आपले जीवन सुकर बनवावे,' असा मोलाचा संदेश युवा कीर्तनकार, सप्तखंजिरीवादक तथा समाजप्रबोधनकार आकाश टाले यांनी दिला. खरकाडा येथील बारा ज्योतिर्लिंग महादेव मंदिर परिसरात नवनिर्माण सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने आयोजित 'आकाशची आकाशवाणी' या कीर्तन प्रबोधन कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन ब्रम्हपुरीचे कॉन्ट्रॅक्टर प्रेमलाल धोटे यांच्या हस्ते पार पडले. अध्यक्षस्थानी माजी जि.प. उपाध्यक्ष क्रिष्णा सहारे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून नानाजी तुपट, उद्योजक सिद्धेश्वर भर्रे, कंत्राटदार रोशन नवघडे, कंत्राटदार ईश्वर प्रधान, योगेश ढोरे, पत्रकार महेश पिलारे, विनोद दोनाडकर खरकाडा येथील उपसरपंच ताराचंद पारधी, मनोज मैंद, तुकारामजी ठाकरे, पोलिस पाटील संगीताताई ढोरे , प्रफुल ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नानाजी तुपट व पत्रकार महेश पिलारे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण मेश्राम यांनी केले. प्रास्ताविक उत्तमजी बगमारे यांनी तर उपस्थितांचे आभार किशोर प्रधान यांनी मानले. या सोहळ्याला खरकाडा, निलज, रणमोचन, पिंपळगाव आदी परिसरातील ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्नीची फसवणूक करून गर्भपात करणाऱ्यावर गुन्हा दाखल

ब्रम्हपुरी/का.प्र.

एका नवविवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला जीवे मारण्याची धमकी देणे, तिच्या असहायतेचा फायदा घेऊन तिचा गर्भपात घडवून आणणे आणि पहिल्या पत्नीला अंधारात ठेवून दुसरा विवाह करणे असा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी तिचा पती, सासू, सासरे, भासरा आणि आत्यासासू अशा एकूण पाच जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गंभीर गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिलेचा विवाह यावर्षी मार्च महिन्यात झाला होता. लग्नानंतर काही दिवस सर्वकाही ठीक चालले होते. मात्र, काही महिन्यांतच तिच्या पतीने शेतीच्या कामासाठी घेतलेल्या हार्वेस्टरचे हप्ते भरण्याच्या नावाखाली माहेरून ४ लाख रुपये आणण्यासाठी तिचा छळ सुरू केला. रंगरूपावरून तिला टोमणे मारणे आणि रात्रीच्या वेळी मारहाण करणे असे प्रकार सातत्याने घडत होते. सासू आणि सासऱ्यांकडूनही पैशांसाठी आणि स्वयंपाकावरून तिला सतत मानसिक त्रास दिला जात होता. दरम्यान, पीडिता गरोदर राहिली असता, पती आणि सासरच्या मंडळींनी बाळ जन्माला घालण्यास तीव्र विरोध केला. 'गर्भपात कर, नाहीतर तुला मारून टाकीन' अशी उघड धमकी पतीने तिला दिली. नंतर वैद्यकीय उपचारादरम्यान पतीने पोटातील बाळ दगावल्याचे खोटे सांगून पीडितेला मानसिकदृष्ट्या घाबरवले आणि तिच्याकडून गर्भपाताच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करून घेतली. अशा प्रकारे तिची फसवणूक करून गर्भपात घडवून आणला गेला.

हा धक्कादायक प्रकार एवढ्यावरच थांबला नाही. ऑगस्ट महिन्यात पतीने पहिल्या पत्नीला काहीही न सांगता दुसऱ्या एका महिलेसोबत गुपचूप विवाह केला. ही बाब समोर आल्यावर आणि प्रकृती सुधारल्यानंतर पीडित महिलेने तात्काळ पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली. याप्रकरणी पोलिसांनी तक्रारीवरून आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ८५, ८८, ८२ (१), ३५१ (२) आणि ३ (५) अन्वये गुन्हा नोंदवला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.


# धर्मराज ग्रामीण बिगरशेती सह.पत संस्था मर्या. पिंपळगांव (भो.) र.नं. ७०११

## - वार्षिक सर्वसाधारण सभा सुचना -

(फक्त सभासदांसाठी)

धर्मराज ग्रामिण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या. पिंपळगाव च्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि २७/०९/२०२६ रोज रविवारला ठिक १.०० वाजता संस्थेच्या आवारात घेण्याचे ठरविलेली आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सभेला उपस्थित राहावे ही विनंती.

सर्व सभासदांना सभेची नोटीस पाठविलेली आहे. काही सभासदांना नोटीस प्राप्त न झाल्यास त्यांनी हीच नोटीस समजून उपस्थित राहावे.

| विकास पं जगणकर | बाळकृष्ण रा. बागडे | मनिषा सु. बगमारे |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | व्यवस्थापक |


# रामदेवबाबा सॉल्व्हेंटतर्फे मोफत रोगनिदान व आरोग्य शिबीर



ब्रम्हपुरी/का.प्र.

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने एक्सेलसिअर फाउंडेशन ट्रस्ट, चंद्रपूर, रामदेवबाबा सॉल्व्हेंट लि., ब्रह्मपुरी आणि आरबीएस रिन्यूएबल्स प्रा. लि., ब्रह्मपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी दहा ते सायंकाळी चार वाजेपर्यंत मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे अनेक नागरिकांकडून नियमित आरोग्य तपासणीकडे दुर्लक्ष केले जाते. परिणामी विविध आजारांची लक्षणे सुरुवातीच्या टप्प्यात लक्षात न आल्याने पुढे आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत नागरिकांना आपल्या आरोग्याची तपासणी करून घेता यावी, सोबतच पैशाअभावी गोरगरीब रुग्ण आपले उपचार करू शकत नाही अशा रुग्णांना या शिबिराच्या माध्यमातून मोफत तपासणी उपलब्ध व्हावी या उदांत हेतूने ह्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

ब्रह्मपुरी शहरासह ग्रामीण भागातील नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शेकडो गरजू रुग्णांनी या शिबिराच्या लाभ घेतला. सामाजिक बांधिलकीतून आयोजित करण्यात आलेल्या या मोफत रोगनिदान शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद लाभला.

रामदेव बाबा सॉल्व्हेंट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संचालक निलेश मोहता यांच्या हस्ते शिबिराचा शुभारंचा करण्यात आला. याप्रसंगी दुर्गादासजी मोहता, ब्रह्मपुरी नगरपरिषदेचे नगरसेवक अविनाश राऊत, अशोक नेत्रालयाचे संचालक स्वप्निल कवठे, डॉ. संदीप दडमल तथास्तु हॉस्पिटल ब्रह्मपुरी. डॉ. तेजस पोतदार मल्टी स्पेशलिस्ट कळमेश्वर, डॉ. वर्षा पोतदार, शिवराज घमगाये, आदित्य देव यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# ब्रम्हपुरी शहर भाजपात युवकांचा पक्षप्रवेश



ब्रह्मपुरी/का.प्र.

भारतीय जनता पार्टी ब्रह्मपुरी शहरामध्ये आज युवकांचा पक्षप्रवेश कार्यक्रम उत्साहात पार पडला. माजी खासदार तथा भाजपा अनुसूचित जमाती आघाडीचे राष्ट्रीय महामंत्री अशोकजी नेते यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच अतुलभाऊ देशकर व डॉ. सुयोग बाळबुधे, शहर अध्यक्ष भाजपा ब्रह्मपुरी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून युवकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

यावेळी सुशील थारकर, काशिफ शेख, वैभव रासेकर, यथार्थ टिकले व दीप बडघरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. उपस्थित मान्यवरांनी नवोदित कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत करून पुढील सामाजिक व संघटनात्मक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास साकेत भानारकर जिल्हा उपाध्यक्ष, अरविंद नंदुरकर जिल्हा सचिव, तनय देशकर जिल्हाध्यक्ष युवा मोर्चा, मनोज भूपाल शहर महामंत्री तथा नगरसेवक, पवन जयस्वाल, स्वप्नील अलगदेवे शहर महामंत्री, मनोज वठे माजी नगरसेवक, दत्ता येरावार, प्रशांत वसाके, अमित रोकडे अध्यक्ष युवा मोर्चा, वर्षा चौधरी, प्रकाश लोखंडे यांच्यासह अंकज कानझोडे, चेतना येवले, सागर हर्षे, रितेश दशमवार, पंकज माकोडे, केतन पेशने, भरत सावकार, अखिलेश नागपूरकर, अक्षय झुरमुरे, गीताताई जांभुळे, दीपक कावळे, बंटी येरावार, सचिन बुराडे, जगदीश दोनाडकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**... QUOTES ...**

"If I have the belief that I can do it, I shall surely acquire the capacity to do it even if I may not have it at the beginning."

- Mahatma Gandhi

# २५ सप्टेंबरला बॅरि. खोब्रागडे चौक स्मारकाचा लोकार्पण सोहळा

ब्रह्मपुरी/का.प्र.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसपुत्र तथा राज्यसभेचे माजी उपसभापती बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जयंती निमित्य बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे स्मारकाचे लोकार्पण सोहळयाला उद्घाटक विजय वडेट्टीवार काँग्रेस विधीमंडळ गटनेते तथा आमदार, ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्र. अध्यक्षस्थानी योगेश मिसार नगराध्यक्ष प्रमुख अतिथी म्हणून देशक गिरीशबाबू खोब्रागडे, डॉ. माधुरी सलामे मुख्याधिकारी, डॉ. देवेश कांबळे, प्रा.डॉ. अनमोल शेंडे, नागभीड तथा नगरपरिषद ब्रम्हपुरीचे सर्व सभापती व नगरसेवक सदर कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. सदर लोकार्पण सोहळा २५ सप्टेंबरला दुपारी २ बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे चौक, वडसा रोड, ब्रम्हपुरी येथे होईल असे जीवन बागडे अध्यक्ष, बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे मेमोरियल ट्रस्ट, ब्रम्हपुरी यांनी कळविले आहे.

**चारोळी**

तुझ्यापेक्षा बायकोच्या प्रेमाचा
हक्क मी अधिक मानतो...
हे तुझ्या रूसण्याचे कारण नको,
आयुष्यातही मी प्रोटोकॉल पाळतो...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये पोळा व गणेशोत्सवानिमित्य विविध उपक्रम



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल.एम.बी. पब्लिक स्कूल ब्रम्हपुरी मध्ये पोळा व गणेशोत्सवानिमित्य विविध उपक्रम साजरे करण्यात आले.

पोळा सणानिमित्य विद्यार्थ्यांनी आकर्षक पध्दतीने सजवलेले नंदीबैल आणून पोळा सणाचा आनंद घेतला. तसेच गणेश मेकिंग स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी clay पासून सुंदर गणेश मूर्ती तयार केल्या.

या अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांना सणांचे महत्व भारतीय संस्कृती, सर्जनशीलता आणि पर्यावरणपूरक उत्सवाचा संदेश मिळाला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कलागुणाचे सुंदर प्रदर्शन केले.

हा उपक्रम संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर आणि पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांच्या मार्गदर्शनात उत्साहात पार पडला.

**जल है तो कल है...**



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.


## नागपूर पदवीधर मतदारसंघात निवडणूकीची...

(पान क्र. १ वरून)

पदवीधर मतदार होते. मात्र, गडकरी यांनी निवडणूक जिंकत आपले वर्चस्व कायम ठेवले.

२०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्यानंतर त्यांनी विधान परिषद सदस्यत्व सोडले आणि त्यानंतर त्यांचे कट्टर समर्थक अनिल सोले या मतदार संघातून निवडून आले. २०१४ मध्ये भाजपचे अनिल सोले आणि काँग्रेसचे बबन तायवाडे यांच्यात प्रमुख लढत झाली. अंतिम निकालात सोले यांना ५२,४८५ मते मिळाली आणि त्यांनी तायवाडे यांचा ३१,२५९ मतांनी पराभव केला.

❀❀❀❀❀❀❀

# राज्यस्तरीय तपासणी समितीची वांद्रा ग्रामपंचायतला भेट

ब्रम्हपुरी/का.प्र.

पंचायत समिती ब्रम्हपुरी अंतर्गत ग्रामपंचायत वांद्रा येथे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राज्यस्तरीय (मंत्रालयीन) तपासणी समितीने दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजी भेट देऊन ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची पाहणी केली.

राज्यस्तरीय तपासणी समितीचे अध्यक्ष विजय जायकर, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या नेतृत्वाखाली समितीने ग्रामपंचायत वांद्रा येथे प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी समितीचे दुर्गेश सोनजे, कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई; शशिकांत शेवगेकर, सहाय्यक कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई; तसेच योगेश येलमार, कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई हे उपस्थित होते. तपासणीदरम्यान समितीने ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, स्मशानभूमी, वृक्षलागवड व संवर्धनाची ठिकाणे, क्रीडांगण तसेच गावातील मंदिरे व विविध धार्मिक स्थळांना भेट देऊन तेथील स्वच्छता, व्यवस्थापन व ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी जिल्हा परिषद चंद्रपूरचे मच्छींद्रनाथ धस, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) तसेच प्रकाशजी उमक, जिल्हा समन्वयक, स्वच्छ भारत मिशन उपस्थित होते. तसेच पंचायत समिती ब्रम्हपुरीचे गट विकास अधिकारी तुषारजी दांडगे, सहाय्यक गट विकास अधिकारी रवींद्र घुबडे, बाल विकास प्रकल्प अधिकारी सुरेश राठोड, गट शिक्षणाधिकारी डॉ. विद्या शेडके, विस्तार अधिकारी (पंचायत) मिलिंद कुरसुंगे, विस्तार अधिकारी (पंचायत) अशोक शामकुळे, प्रशासक गायत्री तोराम यांची उपस्थिती होती. ग्रामपंचायत वांद्राचे सर्व माजी सदस्यगण, ग्रामपंचायत अधिकारी ऋषीश्वर औरासे, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामपंचायत वांद्रा यांच्या वतीने स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, जलव्यवस्थापन, वृक्षलागवड, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, शाळा व अंगणवाडी परिसराचे सुशोभीकरण, ग्रामस्थांचा सहभाग आणि विविध लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती समितीसमोर सादर करण्यात आली.

ग्रामपंचायतीने लोकसहभाग, श्रमदान आणि सामूहिक प्रयत्नातून राबविलेल्या विविध उपक्रमांची पाहणी केल्यानंतर राज्यस्तरीय तपासणी समितीने समाधान व्यक्त केले व ग्रामपंचायत वांद्राच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या भेटीमुळे ग्रामपंचायत वांद्रा येथील स्वच्छता, पर्यावरण संवर्धन व लोकसहभागातून सुरू असलेल्या विविध उपक्रमांना निश्चितच प्रोत्साहन मिळाले असून, भविष्यातही गाव अधिक स्वच्छ, सुंदर, हरित बनविण्यासाठी ग्रामस्थांच्या सहभागातून विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला.

# विद्युत पुरवठा तोडूनही महावितरणची फसवणूक

ब्रम्हपुरी/का.प्र.

वीज बिल थकल्यामुळे महावितरणने वीज पुरवठा खंडित केला, तरीही एका महाशयांनी बिल भरण्याचे नाव घेतले नाही. उलट थेट मिटरमध्येच फेरफार करून अनधिकृतपणे वीज वापरणे सुरू ठेवले. पण हा प्रकार जास्त दिवस टिकला नाही. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी अचानक दिलेल्या भेटीत हा सर्व प्रकार उघडीकीस आला असून याप्रकरणी पोलीस ठाण्यात थेट गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ग्राहकाकडे मागील महिन्याची सुमारे २,३२० रुपयांची वीज बिल थकबाकी होती. बिल न भरल्यामुळे महावितरणच्या नियमानुसार त्यांचा वीज पुरवठा आधीच खंडित करण्यात आला होता. तरीही बिल का भरले गेले नाही, हे तपासण्यासाठी महावितरणच्या पथकाने गुरुवारी दुपारी अचानक संबंधित ठिकाणी भेट दिली आणि पाहणी सुरू केली.

पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांना तिथे मोठा गैरप्रकार आढळून आला. ग्राहकाने मिटरच्या 'टर्मिनल'मधील आउटगोइंग वायर काढून ती थेट इन्कमिंग टर्मिनलला जोडली होती. अशा प्रकारे महावितरणची दिशाभूल करत अनधिकृतपणे वीज वापरली जात होती. महावितरणच्या अंदाजानुसार, या फेरफारीद्वारे एकूण १११ युनिटची म्हणजेच सुमारे ७०९ रुपयांची वीजचोरी करण्यात आली आहे. या चोरीची तडजोड रक्कम दोन हजार रुपये इतकी आकारण्यात आली आहे.

याप्रकरणी उपकार्यकारी अभियंत्यांनी पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दिली आहे. महावितरणच्या तक्रारीवरून संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ आणि १३८ अन्वये वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सर्व पुरावा पोलिसांनी ताब्यात घेतला असून पुढील कारवाई सुरू आहे. थकबाकी न भरता परस्पर वीज वापरणाऱ्या ग्राहकांचेही धाबे यामुळे चांगलेच दणाणले आहेत.


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404